follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

| पश्चिम महाराष्ट्र |

RNI Regd. No. 72105/99 | वर्ष २५ | अंक ३२१ | सातारा | बुधवार दि.२१ ऑगस्ट २०२४ | पाने ४ | किंमत ५/- रूपये

# बदलापूर अत्याचार प्रकरण : विरोधकांचा संताप

## ८ तासांपासून रेलरोको : आंदोलकांकडून नराधमांना फाशीच्या शिक्षेची मागणी

**मुंबई :** मुंबई जवळ असलेल्या बदलापूर शहरातील एका नामांकित शाळेतील चिमुरडींवर लैंगिक अत्याचार केल्यामुळे संतप्त पालकांनी बदलापूर बंदची हाक दिली. बदलापूर परिसरात जनता रस्त्यावर उतरल्यानं आंदोलन चिघळलं. त्यामुळे आंदोलकांनी पोलिसांवर दगडफेक केली. बदलापूर रेल्वे स्थानकात रेल रोको आंदोलन सुरू असून, आंदोलकांकडून नराधमांना फाशीच्या शिक्षेची मागणी केली जात आहे.

या प्रकरणी आता विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर हल्लाबोल केला आहे. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीकेचा भडीमार होत आहे.



बदलापूरमध्ये ३ वर्षाच्या मुलींवर शाळेत अत्याचाराच्या घटनेनंतर संतापाचा उद्रेक झाला. यानंतर मंगळवारी बदलापूर रेल्वे स्थानकात पालकांसह नागरिकांनी आंदोलन केलं. सकाळी सहा वाजल्यापासून आंदोलक रेल्वे स्थानकात जमायला सुरुवात झाली. त्यानंतर अकराच्या सुमारास रेल्वे रुळावर उतरत रेल रोको आंदोलन सुरु करण्यात आलं. यामुळे मध्य रेल्वेच्या वाहतुकीला मोठा फटका बसला. ३० लोकल गाड्या रद्द केल्या गेल्या तर ११ लोकल वळवण्यात आल्या. याशिवाय काही एक्सप्रेस गाड्या विलंबाने धावत आहेत.

सकाळी ६:०० वाजेपासून बदलापूर स्थानकात आंदोलन जमण्यास सुरुवात झाली होती. साधारणत: दोन ते अडीच हजार आंदोलकांचा जमाव बदलापूर स्थानकात असणाची शक्यता आहे. याचा परिणाम मध्य रेल्वेच्या उपनगरी रेल्वे सेवेवर झाला असून आत्तापर्यंत ३० गाड्या अंशत: रद्द करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. बविशिष्ट संस्था असल्यानं या प्रकरणाती आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न केला जात, असा आरोप विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला.

राज्यात कायद्याचा धाक राहिला नाही. विरोधी पक्ष नेते वडेट्टीवार यांनी पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्याशी फोनवरुन चर्चा केली. या प्रकरणी ''पालकांना बसवून ठेवलेल्या महिला पोलीस कर्मचाऱ्याचं निलंबन करावं अशी मागणी देखील त्यांनी केली. बदलापुरातील आंदोलनाबाबत फडणवीस म्हणाले, बदलापूर व रेल्वेस्थानकात आंदोलन करणारा जमाव स्वयंस्फूर्तीने आला आहे की इतर काही गोष्टींमुळे लोक जमले आहेत यावर मी काही बोलणार नाही. हा लोकांच्या भावनांचा उद्रेक असू शकतो. गुन्हेगाराला तात्काळ फाशी द्या अशी मागणी लोकांनी केली आहे. मात्र कायद्याच्या मार्गाने जे काही तातडीने करता येईल ते करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

## थोडक्यात

### आंदोलनाला बसलेल्या गडप्रेमींना पोलिसांची नोटीस

**भाईंदर :** मीरा भाईंदर शहरातील ऐतिहासिक घोडबंदर किल्यावर सुरक्षा रक्षक नसल्यामुळे वाढलेल्या असामाजिक लोकांच्या वावरामुळे किल्ल्याचे पावित्र्य धोक्यात आले आहे. यासाठी आंदोलनाला बसलेल्या गडप्रेमींना पोलिसांनी नोटीस बजावल्याने अनेक सामाजिक संस्था, राजकीय नेते, पत्रकार यांनी गडप्रेमींना पाठिंबा दर्शवत आंदोलनाच्या ठिकाणी एकच गर्दी केली आहे.

मीरा भाईंदर महापालिका क्षेत्रात असलेला घोडबंदर किल्ला हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या पद स्पर्शाने पावन झालेला किल्ला असल्याची नोंद इतिहासात आहे. पुरातत्व विभागाने सुरक्षा आणि संवर्धन करण्यासाठी हा किल्ला महापालिकेकडे सोपवला आहे. ऐतिहासिक वारसा लाभलेला हा किल्ला महापालिकाकडे आल्यावर प्रशासनाने त्याची सुरक्षा देखभाल करण्यासाठी सुरक्षा रक्षक तैनात करणे तसेच सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे आवश्यक होते. परंतु प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे किल्ल्यावर असामाजिक लोकांचा वावर वाढला आहे.

किल्ल्यावर मद्यपानाच्या बाटल्या, नशेच्या बाटल्यांचा खच पडू लागला आहे. त्यामुळे किल्ला जतन समितीच्या वतीने रोहित सुवर्णा आणि समिती सदस्यांनी महापालिका आयुक्त संजय काटकर यांची भेट घेऊन त्यांना किल्यावर सुरक्षा रक्षक नेमणे आणि सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याबाबतचे निवेदन दिले होते. परंतु गड- प्रेमींची मागणी पुर्ण करण्यास आयुक्तांनी असमर्थता दर्शविली. त्यामुळे गडप्रेमींनी सोमवारपासून भाईंदर पश्चिम येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानात बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले होते. मंगळवारी सकाळी भाईंदर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६८ प्रमाणे गडप्रेमी आंदोलकांना नोटीस बजावली आहे. सदर बातमी शहरात वाऱ्यासारखी पसरली आणि गडप्रेमींना पाठिंबा दर्शविण्यासाठी अनेक सामाजिक संस्था, यांनी आंदोलनाच्या ठिकाणी एकच गर्दी केली आहे.

# महायुतीत वर्चस्ववादाची लढाई

## आरोप-प्रत्यारोपांच्या फैरींनी वाद भडकणार

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीतील आलेल्या अपयशानंतर विधानसभा निवडणुकीत यश मिळवण्यासाठी राज्यातील महायुतील वरिष्ठ नेत्यांकडून जोरदार प्रयत्न सुरू झाले आहेत. पण तरीही महायुतीतील तीनही नेत्यांमध्ये दुरावा असल्याचेही दिसून येत आहे. एकमेकांवरील आरोप प्रत्यारोपांमुळे या तिघांमध्ये मतभेद समोर येत आहेत. अशातच विधानसभा निवडणुकीच्या आधीच भाजप, शिंदे गट आणि अजित पवार यांच्या गटात वादाचा आता भडका उडाला आहे. विशेष म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वत:च यावर भाष्य केलं आहे.

सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि शिंदे गटाचे नेते रवींद्र चव्हाण आणि शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांच्यातील वाद समोर आले होते. दोघांमध्ये एकदम थोबाड फोडण्याची भाषा करण्यात आली. तर दुसरीकडे शिंदे गटाचे आमदार महेंद्र थोरवे यांनीदेखील अजित पवार गटाचे खासदार सुनील तटकरे यांच्यावर टीका केली होती. त्यानंतर पुण्याचे भाजपचे आमदार जगदीश मुळीक यांनी अजित पवार यांच्या गटाचे आमदार अमोल मिटकरी यांच्यातही जोरदार वादावादी झाली होती. या सर्व प्रकारामुळे महायुतीत मतभेद चव्हाट्यावर येत आहेत. त्यामुळे महायुतीत नक्की चाललंय काय, विधानसभेपर्यंत महायुती टिकणार का, असेही प्रश्न उपस्थित होऊ लागले. त्यानंतर या सर्व प्रकरणावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अगदीच मोजक्या शब्दांत प्रतिक्रीया दिली. महायुतीत कुठलाही मिठाचा खडा पडणार नाही, असे त्यांनी म्हटले होते.

दरम्यान, रविंद्र चव्हाण यांनी कोकणासाठी काहीच केलं नाही, त्यांना महायुती तोडायची आहे, त्यांना बाजूला करा, असा आरोप रामदास कदम यांनी केला होता. त्यावर रवींद्र चव्हाण यांनी कदमांना प्रत्युत्तर देत तोंड सांभाळून बोला, नाहीतर तोंड फोडू, अशा शब्दांत सुनावले होते. तर, खासदार सुनील तटकरे हे विश्वासघातकी आहेत. राष्ट्रवादी हा विश्वासघात करणारा पक्ष आहे. कर्जतमध्ये त्यांचे तेच सुरू असल्याच आरोप शिंदेसेनेचे आमदार महेंद्र थोरवे यांनी केला होता. त्यावर महेंद्र थोरवे हे माझ्यासाठी अदखलपात्र आहेत. त्यामुळे आमचे स्थानिक नेतेच त्यांना उत्तर देतील, अशी शेलक्या शब्दांत उत्तर देत तटकरेंनी त्यांची खिल्ली उडवली.

# बदलापूर घटनेची अतिशय गंभीर दखल

## आरोपींवर फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालवणार

**मुंबई :** बदलापूरमध्ये एका शाळेत मुलींवर झालेल्या अत्याचाराची अतिशय गंभीर दखल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली असून अशा घटना घडल्यास प्रसंगी संस्थाचालकांवर देखील कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिला आहे. आरोपीला कडक शासन करण्यात येईल, यासाठी जलदगती न्यायालयात (फास्ट ट्रॅक) तातडीने खटला चालविण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

यासंदर्भात मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी पोलीस आयुक्तांशी देखील चर्चा केली. तसेच शाळांमध्ये 'सखी सावित्री समित्या' स्थापन झाल्या आहेत किंवा नाही ते तपासण्याचे निर्देशही मुख्यमंत्री यांनी दिले.

बदलापूर पूर्वमधील एका नामांकित शाळेत दोन मुलींवर झालेल्या अत्याचाराची माहिती



मिळताच मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी तातडीने शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्याशी चर्चा केली आणि अशा घटना होऊ नयेत म्हणून कायमस्वरूपी ठोस उपाययोजना करण्यास सांगितले. विद्यार्थी किंवा पालकांना अडचणी येत असतील त्यांच्यासाठी प्रत्येक शाळेत एक तक्रार पेटी लावावी, अशी सूचना त्यांनी केली. याशिवाय शाळेतील ज्या कर्मचाऱ्यांचा विद्यार्थ्यांशी सातत्याने संपर्क असतो त्यावर बारकाईने लक्ष ठेवणे आणि त्याचा पाठपुरावा करून त्यांची पार्श्वभूमी माहिती करून घेणे गरजेचे आहे.

विद्यार्थिनींना संशय आल्यास संबंधित व्यक्तीस न घाबरता तातडीने प्राचार्य, मुख्याध्यापक किंवा शिक्षकांना निदर्शनास आणून देता आले पाहिजे अशी यंत्रणा हवी. सर्व शाळांमधील शिक्षक आणि कर्मचारी यांच्याशी संस्थाचालकांनी चर्चा करून योग्य ती काळजी घ्यावी. जर संस्थाचालकांची चूक असेल तर त्यांच्यावर देखील कारवाई केली जाईल असे सांगून मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी रेल्वे आंदोलकांना शांततेचे आवाहन केले आहे.

# अंबरनाथमध्ये 'हीट अँड रन'पेक्षा भयानक घटना, कारने ५ जणांना ठरवून चिरडले



**अंबरनाथ :** अलीकडे मुंबई आणि पुण्यामधील हीट अँड रन्स प्रकरणामुळे अवघा महाराष्ट्र हादरला होता. हीट अँड रन प्रकरणामध्ये निष्पाप लोकांचा जीव गेला. अशातच आता अंबरनाथमध्ये एक धक्कादायक घटनासमोर आली आहे. एका कारने पाच जणांना उडवल्याची घटना घडली आहे. जुन्या वादातून ही घटना घडल्याचं बोललं जात आहे. या घटनेमध्ये एकाचा मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अंबरनाथमधील जांभूळफाट्याजवळ ही घटना घडली आहे. मुख्य रस्त्यावर ही घटना घडली आहे. टाटा सफारी या एसयुव्हीने एका पांढऱ्या रंगाच्या फॉर्च्युनर कारचा पाठलाग केला होता. जेव्हा फॉर्च्युनर ही रस्त्याच्या बाजूला उभी होती. त्यानंतर या टाटाच्या कारने पाठीमागून येऊन जोराची धडक दिली.

फॉर्च्युनरला धडक दिल्यानंतर एका व्यक्तीला कारने फरफटत नेलं. यातच त्याचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या अपघातात ४ जण जखमी झाले आहे. जखमींना तातडीने नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या दोन्ही गाड्यामध्ये कोण होते, हा अपघात का झाला याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. या अपघाताचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. घटनास्थळी पोलीस दाखल झाले आहे. या घटनेची अधिक तपास पोलीस करत आहे.

# झिशान सिद्दिकी काँग्रेस सोडून जाणार अजित पवार गटात

**मुंबई :** काँग्रेसचा मुंबईतील अल्पसंख्य समाजातील तरुण चेहरा आणि वांद्रे पूर्व येथील आमदार झिशान सिद्दिकी काँग्रेसला रामराम करून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेश करणार असल्याच्या चर्चांनी जोर पकडलेला असतानाच सिद्दिकी यांनी आपल्या पक्षप्रवेशाबाबतचा निर्णय जनताच घेईल, असे सूचक वक्तव्य केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची जनसन्मान यात्रा वांद्रे येथून जाणार असून त्यावेळी आमदार सिद्दिकी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह दुचाकी रॅलीद्वारे या यात्रेत सहभागी होणार आहेत, अशी चर्चा आहे. त्याबद्दल बोलताना सिद्दिकी म्हणाले की, अजित पवार हे राज्याचे उपमुख्यमंत्री आहेत. त्यांनी महिलांना दिलासा देणारी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अमलात आणली आहे. माझ्या मतदारसंघातील अनेक महिलांना त्याचा मोठा लाभ प्राप्त झाला आहे. त्यामुळे त्यांचे स्वागत करण्यासाठी माझ्या मतदारसंघातील जनता सन्मान यात्रेत सहभागी होणार आहे.

काँग्रेसच्या वतीने दोन दिवसापूर्वी आपल्या मतदारसंघातून मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष वर्षा गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली न्याय यात्रेचे आयोजन केले होते. या न्याय यात्रेत सहभागी होण्यासाठी आपल्याला निमंत्रण देण्यात आले नाही. निमंत्रणच काय, या यात्रेच्या आयोजनाबाबत माहितीही आपल्याला देण्यात आली नाही. त्याबद्दल आपल्या मनात कोणताही राग नाही किंवा नेत्यांबद्दल तक्रार नाही. मात्र, न्याय यात्रेत सहभागी होता न आल्याचे दुःख निश्चितपणे आहे, असेही सिद्दिकी म्हणाले.

# तर राजकारणातून संन्यास घेऊ: फडणवीस यांचे जरांगे पाटील यांना प्रत्युत्तर

**मुंबई:** मराठा आरक्षणासह समाजाच्या हिताचे कोणतेही निर्णय घेताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर आपण आडकाठी केल्याचे सिद्ध झाले तर उपमुख्यमंत्री पदाचा राजीनामा देऊन राजकारणातून संन्यास घेऊ, असे मोठे विधान करून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्यावर मराठा आंदोलन मनोज जरांगे पाटील यांच्याकडून वारंवार करण्यात आलेल्या आरोपांना प्रत्युत्तर दिले आहे.



मराठा समाजाच्या हिताचे जे काही निर्णय आमच्या सरकारने घेतले त्यासाठी प्रामुख्याने मी स्वतः व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुढाकार घेतला आहे. एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या निर्णयांच्या पाठीशी आपण कायम ठामपणे उभे राहिलो आहोत. अशावेळी मराठ्यांना आरक्षण मिळू नये यासाठी फडणवीस आडकाठी करीत असल्याचे कथित (नरेटिव्ह) पसरविणे अयोग्य आहे, असेही फडणवीस म्हणाले.

मनोज चरंगे पाटील यांच्या मराठा आरक्षण आंदोलनात त्यांनी सातत्याने फडणवीस यांच्यावर टीका केली आहे. मराठ्यांना आरक्षण मिळण्यामध्ये फडणवीस हा एकमेव अडथळा असल्याचा त्यांचा आरोप आहे. फडणवीस एकीकडे मराठा समाजाशी गोडी गुलाबी ने बोलतात आणि दुसरीकडे इतर मागासवर्गीय नेत्यांना मराठा समाजावर सोडतात, असा आरोपही जरांगे पाटील यांनी केला आहे.

# अग्रवाल कुटुंबाचा कारसाठी नवा अर्ज

**पुणे :** पुण्यातील कल्याणीनगर येथील पोर्शे कार अपघात प्रकरणी नवी अपडेट समोर आली आहे. अपघातग्रस्त पोर्शे परत मिळावी यासाठी अग्रवाल कुटुंबाने बाल न्याय मंडळात अर्ज दाखल केला आहे. कल्याणीनगर येथे १९ मे रोजी अल्पवयीने मुलाने या कारने दोघांना चिरडलं होतं. या भीषण अपघातात दोघांचा मृत्यू झाला होता. यानंतर कोर्टाने सुनावलेली ३०० शब्दांचा निबंध लिहिण्याची शिक्षा वादात सापडली होती.

पोर्शे परत मिळवण्यासाठी अर्ज

कल्याणीनगर अपघात प्रकरणातील अपघातग्रस्त पोर्शे कार परत मिळण्यासाठी अग्रवाल कुटुंबीयांनी बाल न्याय मंडळात अर्ज दाखल केला आहे. या अर्जावर २६ ऑगस्ट रोजी सुनावणी होणार आहे. २८ ऑगस्टला याप्रकरणी निर्णय येण्याची शक्यता आहे. कोर्टाने पोलिसांना यावर २८ जुलैपर्यंत आपलं म्हणणं मांडा असा आदेश दिला होता. पण अद्याप पोलिसांनी यावर काहीही उत्तर दिलेलं नाही.

आरोपींच्या अर्जावर मंगळवारी सुनावणी

या अपघाताप्रकरणी आरोपी मुलाचे वडील आणि बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल, आई शिवानी अग्रवाल, ससूनच्या न्यायवैद्यक विभागाचा प्रमुख डॉक्टर अजय तावरे, आपातकालीन विभागाचा मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉक्टर श्रीहरी हाळनोकर, अश्पाक मकानदार आणि अमर गायकवाड यांना अटक करण्यात आली आहे. हे सर्वजण येरवडा कारागृहात आहेत. या सर्वांनी जामीन मिळावा यासाठी अर्ज दाखल केला आहे. उद्या मंगळवारी २० ऑगस्टला याप्रकरणी पुढील सुनावणी होणार आहे.

नेमकी घटना काय?

पुण्यात १९ मे रोजी कल्याणीनगरमध्ये १७ वर्षीय अल्पवयीन मुलाने बेदरकारपणे पोर्शे कार चालवत दोघांना उडवलं होतं. त्यात दोन तरुणांचा मृत्यू झाला. पोलिसांनी माध्यमांना दिलेल्या माहितीनुसार या अपघातावेळी हा अल्पवयीन तरुण मद्यधुंद अवस्थेत होता. परंतु, फक्त १५ तासात त्याला जमीन मंजूर करण्यात आला. जामिनसाठी घातलेल्या अटींमध्ये ३०० शब्दांचा निबंधही होती. यावरुन अनेकांनी नाराजी जाहीर केली होती.

मृतकाच्या मित्राने एफआयआर दाखल करण्यासाठी धाव घेतल्यानं ही घटना पहिल्यांदा समोर आली होती. पुणे पोलिसांनी दिलेल्या माहितीत अनिश अवधिया आणि आश्विनी कोष्टा अशी दोघा मृत्यू झालेल्या पीडितांची नावं आहेत. दोघेही मध्यप्रदेशमधील रहिवासी होते. सॉफ्टवेअर इंजिनिअर असलेले अनिश आणि अश्विनी पुण्यात जॉब करत होते.

# बाळासाहेब थोरात यांचा सत्ताधाऱ्यांवर आरोप

**मुंबई:** सरकारी तिजोरी चा वापर करून जास्तीत जास्त काळ राजकीय प्रचार करता यावा, म्हणून सत्ताधाऱ्यांनी महाराष्ट्रातील निवडणूक पुढे ढकलण्याचा आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी केला.



निवडणूक आयोगाने नुकतीच जम्मू काश्मीर आणि हरियाणा विधानसभा निवडणुकांची घोषणा केली आहे. वास्तविक या दोन राज्यांबरोबरच महाराष्ट्र आणि झारखंड अशा एकूण चार राज्यांच्या विधानसभा निवडणुका एकत्र होतील अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात, निवडणूक आयोगाने महाराष्ट्र आणि झारखंडची निवडणूक लांबणीवर टाकली आहे. या विलंबामुळे निवडणूक आयोगाच्या कार्यक्षमतेवर, पक्षनिरपेक्षतेवर आणि स्वायत्ततेवर प्रश्नचिन्ह उभे केले जात आहे.

वास्तविक निवडणूक आयोग ही एक स्वायत्त संस्था आहे. निवडणूक आयोगाची धुरा टी एन शेषन यांच्याकडे असताना राजकीय पक्षांवर निवडणूक आयोगाचा दबदबा होता. सध्याच्या काळात तो शिल्लक राहिलेला नाही. निवडणूक आयोगासारखी स्वायत्त संस्था एखाद्या राजकीय पक्षाच्या प्रभावाखाली येणे, लोकशाहीच्या दृष्टीने अयोग्य आहे, असे मत थोरात यांनी व्यक्त केले.

जम्मू कश्मीर, हरियाणा, महाराष्ट्र आणि झारखंड या चार राज्यांची निवडणूक एकत्रपणे एकाच वेळी न घेतल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'वन नेशन वन इलेक्शन' या महत्त्वाकांक्षी संकल्पनेचीही विरोधकांकडून खिल्ली उडवली जात आहे. ज्या निवडणूक आयोगाला चार राज्यांच्या विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेता येत नाहीत तो निवडणूक आयोग देशातील लोकसभा आणि सर्व राज्यातील विधानसभा यांच्या निवडणुका एकाच वेळी कशा घेऊ शकणार, असा सवाल या निमित्ताने उभा केला जात आहे.

# गैरसोयीच्या विळख्यात अडकलेल्या मसूर बस स्थानकात सुविधा न केल्यास २६ ऑगस्टला बस रोको आंदोलन

मसूर : गैरसोयीच्या विळख्यात अडकलेल्या मसूर बसस्थानकात २५ ऑगस्ट पर्यंत सुविधा न केल्यास २६ ऑगस्टला जुन्या बसस्थानक चौकात बस रोको आंदोलन करण्याचा इशारा जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व शिक्षण सभापती मानसिंगराव जगदाळे यांनी परिवहन खात्याला पत्रकार परिषदेत दिला.

मानसिंगराव जगदाळे म्हणाले मसूरमध्ये राज्यात प्रथम बीओटी तत्त्वावर बसस्थानकाचे बांधकाम वीस वर्षांपूर्वी करण्यात आले. सुसज्ज इमारत व दुकानगाळे सुस्थितीत आहेत. मसूर बसस्थानक हे जिल्ह्यातील चांगले उत्पन्न देणारे बसस्थानक आहे. या बसस्थानक व व्यापारी संकुलाचे उद्घाटन २००५ साली तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार, परिवहन मंत्री धर्मराव बाबा आत्राम व महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे अध्यक्ष सुधाकरपंत परिचारक यांच्या हस्ते झाले होते. सद्यस्थितीत हे बसस्थानक



व व्यापारी संकुल सुस्थितीत असून महामंडळाकडून देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांची अत्यंत दुरावस्था झाली आहे. बसस्थानकातील व्यापारी संकुल रात्रीच्या वेळी बंद झाल्यानंतर सायंकाळी लाईट बंद असतात. स्थानकात लाईट सुरू नसल्याने गैरप्रकार होत आहेत. व्यापारी संकुलातील प्रत्येक गाळेधारकांना त्यांच्या गाळ्या समोरील रात्रीच्या वेळी लाईट लावण्याचा सूचना द्याव्यात. बसस्थानकात आवश्यक त्या प्रमाणात लाईटची सोय करावी.

**बसस्थानक परिसरात डांबरीकरण नाही. जागोजागी खड्डे व खड्ड्यात साचलेले पाणी. कचऱ्यांचा खच, स्थानकाच्या डाव्या बाजूस झाडे झुडपे, साचलेल्या पाण्याची दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात, खाजगी वाहनांचा तळ अशी बसस्थानकाची अवस्था आहे.**

महिला व पुरुष स्वच्छतागृहाची अत्यंत दुरावस्था झाली आहे. परिसरात अस्वच्छता व गलिच्छ अवस्था आहे. स्वच्छतागृहांची दुरुस्ती करावी. रोजच्या रोज ते स्वच्छ ठेवावेत. सायंकाळी ५ नंतर कराडहून मसूरला येण्यासाठी बस नसल्याने विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागतो. पाच नंतर मसूरला येण्यासाठी बस सोडाव्यात.

सदर निवेदनाच्या प्रती विभागीय नियंत्रक राज्यपरिवहन विभाग सातारा, जिल्हाधिकारी सातारा, आगार

**विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करावी. याबाबतीत आम्ही महामंडळाकडे तोंडी स्वरूपात बऱ्याच वेळा मागणी केली असून त्याकडे महामंडळाचे अधिकारी सातत्याने दुर्लक्ष करत आहेत. बसस्थानक आवारात स्ट्रीट लाईट बसवण्यात याव्यात. असे जगदाळे यांनी स्पष्ट केले.**

व्यवस्थापक राज्य परिवहन मंडळ कराड, तहसीलदार कराड, सहाय्यक पोलीस निरीक्षक मसूर पोलीस स्टेशन यांना देण्यात आले आहेत. पत्रकार परिषदेस सातारा जिल्हा बँकेचे संचालक लहूराज जाधव, प्रा. कादर पिरजादे, माजी सरपंच पंकज दीक्षित, माजी उपसरपंच विजयसिंह जगदाळे, माजी सरपंच दिनकर शिरतोडे, प्रकाश माळी, विकास पाटोळे, महेश घाटगे, जमीर मुल्ला, युवराज जगदाळे, सिकंदर शेख, प्रशांत पाटील आदी उपस्थित होते.

# पुणे, संभाजीनगरसह राज्यातील 'या' जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा इशारा



**मुंबई :** राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मागील २४ तासांपासून जोरदार पाऊस होत असल्याचे चित्र आहे. हवामान विभागाने वर्तवल्याप्रमाणे जालना, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे या जिल्ह्यांमध्ये अनेक ठिकाणी जोरदार पाऊस झाला. पुढील २४ तासांसाठी देखील हवामान विभागाने राज्यातील अनेक विभागांना मुसळधार पावसाचा इशारा दिलाय. दक्षिण कोकण, मध्यमहाराष्ट्र, मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये तुरळ ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ सोसाट्याचा वारा आणि मुसळधार पावसाची शक्यता आहे. तर विदर्भातील जिल्ह्यांमध्ये देखील तुरळ ठिकाणी विजांच्या कडकडाटासह आणि सुसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. पाहूयात पुढील २४ तासांमध्ये राज्यातील हवामानाची स्थिती कशी राहील.

मुंबई शहर आणि उपनगरात पुढील २४ तासांमध्ये सर्वसाधारणपणे ढगाळ आकाश राहून विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर मुंबईतील कमाल तापमान ३३ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २७ अंश सेल्सिअसच्या आसपास असेल तर दक्षिण कोकणातील सिंधुदुर्गमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे.

मध्य महाराष्ट्रातील कोल्हापूर, पुणे आणि उत्तरमध्य महाराष्ट्रातील अहमदनगर, नाशिक आणि जळगाव या जिल्ह्यांना देखील हवामान विभागाने मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. तर मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मागील २४ तासांमध्ये तुरळक ठिकाणी मुसळधार तर काही ठिकाणी जोरदार पावसाने हजेरी लावल्याचे चित्र पाहायला मिळाले. यामुळे मराठवाड्यातील अनेक नदी नाल्यांना पूर आला असून धरणांमध्ये पाण्याची आवक येण्यास सुरुवात झाली आहे. पुढील २४ तासांमध्ये मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. तर मराठवाड्यातील उर्वरित जिल्ह्यांमध्ये देखील मेघगर्जनेसह मध्यम पार विदर्भातील जिल्ह्यांमध्ये देखील पुढील २४ तासांमध्ये पावसाचा जोर हा कायम राहणार असून विजांच्या कडकडाटासह वादळ सोसाट्याचा वारा आणि ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली.

# शिवसेना सातारा शहरच्यावतीने मुख्यमंत्र्यांना चांदीची तलवार भेट

**सातारा :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळ्यासाठी साताऱ्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस रविवारी आले होते. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शिवसेना सातारा शहरच्यावतीने चांदीची तलवार व कंदी पेढ्याचा हार घालून त्यांचे स्वागत करण्यात आले.

सैनिक स्कूल मैदानावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळा रविवारी आयोजित केला होता. या सोहळ्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्यासह जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी उपस्थित होते. सैनिक स्कूल मैदानावरील कार्यक्रमस्थळी मान्यवरांचे आगमन होताच शिवसेना सातारा शहरच्यावतीने जंगी स्वागत करण्यात आले. सातारा शहर प्रमुख निलेश मोरे यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री शिंदे यांना चांदीची तलवार भेट देऊन कंदी पेढ्याचा हार ही घालण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी तलवार उंचावताच एकच जल्लोष झाला.

उपस्थितामधून छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी संजय मोरे,रुपेश सपकाळ, प्रीतम पवार, अमोल इंगवले, विक्रम यादव,अजिंक्य राजपूत, अमोल खुडे, शुभम भिसे, सिद्धेश जाधव, धीरज सकपाळ, प्रथमेश बाबर यश खत्री आदी शिवसैनिक उपस्थित होते.

# जरांगेंच्या आरोपात तथ्य नाही : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई :** मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या आरोपात तथ्य नसल्याचे स्पष्टीकरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे.

याबाबत मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी मी, देवेंद्र फडणवीस, अजित पवार एकत्र बसलो. आरक्षणासाठी विशेष अधिवेशन बोलावले. प्रत्येक बैठकीला देवेंद्र फडणवीस होते. मराठा आरक्षणासाठी जो कायदा केला त्यात फडणवीसांची मोलाची भूमिका होती. अजित पवारही सहभागी होते. मनोज जरांगेंच्या मागणीनुसार मराठवाड्यात ज्यांच्या कुणबी नोंदी ते आम्ही देऊ लागलो. मराठा समाजाला ज्या सवलती होत्या त्या दिल्या. मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिले त्याला विरोध करायला कोर्टात कोण गेले ते आधी बघा असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

मराठा आरक्षणाच्या निर्णयात देवेंद्र फडणवीसांची मोलाची भूमिका आहे. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना देखील त्यांनी मराठा समाजाला आरक्षण देण्याचे काम केले



होते. त्यावेळीही मी मंत्री होतो, त्या समितीमध्ये होतो, त्यामुळे देवेंद्रजी मराठा समाजाला विरोध करतात असं म्हणणं पूर्णपणे चुकीचं आहे. त्यामध्ये, कुठलंही तथ्य नाही, हा खोटा आरोप आहे, असे म्हणत मनोज जरांगे यांच्याकडून होत असलेल्या आरोपावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही रोखठोक भूमिका मांडली. तसेच, मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसीसह इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही, ही आमची भूमिका काल, आज आणि उद्याही कायम आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने वैद्यकीय विभागाच्या मुलाखती पुढे ढकलल्या

**मुंबई :** महाराष्ट्र आयोगाच्या २३ ऑगस्ट, २०२४ रोजी होणाऱ्या मुलाखती पुढे ढकलण्यात आल्या आहेत. या मुलाखती ३० ऑगस्ट, २०२४ रोजी होणार आहेत.

महाराष्ट्र आयोगातर्फे संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ पदांच्या मुलाखती पुढे ढकलण्यात आल्या आहेत. या मुलाखतींचे आयोजन आयोगाच्या नवी मुंबई, सीबीडी, बेलापूर येथील कार्यालयात करण्यात आले होते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे छाननीअंती मुलाखतीसाठी पात्र असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती प्रशासकीय कारणास्तव पुढे ढकलण्यात आल्या आहे. तरी सर्व उमेदवारांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे उपसचिव (सरळ सेवा – निकाल) यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये केले आहे.

# वक्फ दुरुस्ती विधेयकाविरोधात सुन्नी मुस्लिम संघटनेतर्फे संयुक्त समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांना निवेदन सादर

**मुंबई :** मुंबईतील इस्लाम जिमखाना येथे आयोजित एका कार्यक्रमात मुस्लिम मौलवींनी वक्फ दुरुस्ती विधेयकाविरोधातील आपली मतं, सूचना, शिफारशी, हरकती संसदेच्या संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष खासदार जगदंबिका पाल यांच्यासमोर मांडल्या. पाल यांनी याची दखल घेतली जाईल आणि या बाबी संयुक्त समितीपुढं ठेवून पुढील कार्यवाही केली जाईल, अशी ग्वाही दिलीय. तसंच गरज भासल्यास या मौलवींना दिल्लीला बोलावून पुढील चर्चा केली जाईल, असंही त्यांनी स्पष्ट केलय. ऑल इंडिया सुन्नी जमियातुल उलामाचे अध्यक्ष मौलाना मोईनुद्दीन अश्रफ यांच्या नेतृत्वाखाली या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. यामध्ये रझा अकादमीचे अध्यक्ष मौलाना मोहम्मद सईद नुरी, ज्येष्ठ वकील रिझवान मर्चट यांच्यासह मुस्लिम समाजाचे सुमारे १५० ते २०० संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

एकदा वक्फ केलेली मालमत्ता नेहमीच वक्फची : यावेळी वक्फ मालमत्तांना धक्का बसणार नाही आणि समाजावर कोणताही अन्याय होणार नाही, याची काळजी घेऊ असं आश्वासन पाल यांनी दिलं. या विधेयकावर ज्या हरकती घेण्यात आल्यात, त्यावर समिती विचार करेल आणि योग्य तो निर्णय घेईल, असंही त्यांनी स्पष्ट केलं. वक्फ बोर्डाची संपत्ती नेहमी वक्फचीच राहाते. वक्फ मालमत्तेचा वापर धार्मिक आणि सामाजिक कार्यासाठीच व्हावा अशी सरकारची भूमिका असून वक्फ मालमत्तेचा गैरवापर होऊ नये यासाठी हे विधेयक आणल्याचं मतही त्यांनी यावेळी व्यक्त केलं.

रझा अकादमीचे संस्थापक अध्यक्ष मोहम्मद सईद नुरी यांनी वक्फच्या हेतूंशी विसंगत असलेला कायदा सरकारनं आमच्यावर लादू नये, अशी अपेक्षा व्यक्त केली. वक्फ बोर्डाकडं असलेली मालमत्ता सरकारनं दिलेली नसून ती मुस्लिम समाजातील नागरिकांनी समाजासाठी दान केलेली मालमत्ता आहे. या मालमत्तेचा वापर करण्याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आलेले आहेत. सरकारी देणगीवर ही मालमत्ता मिळवलेली नाही. त्यामुळं याबाबतचे गैरसमज दूर होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. सरकार या विधेयकाच्या आडून पारदर्शकतेच्या नावाखाली सरकारी नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळं आमचा त्याला विरोध असल्याचंही मौलाना नुरी म्हणाले.

यावेळी बोलाना ज्येष्ठ वकील रिझवान मर्चट म्हणाले, ''जी मालमत्ता आतापर्यंत वक्फच्या ताब्यातून गेलीय ती परत मिळवणं कठीण आहे. मात्र, त्या संपत्तीच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वापर वक्फसाठी करण्यात यावा यासाठी कायदा करावा.'' तसंच मुस्लिम समाजाच्या शिक्षण, आरोग्य अशा सुविधांसाठी कायदेशीर तरतूद करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. वक्फ बोर्डाचे माजी सदस्य सय्यद जमील यांनी वक्फ बोर्डाचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्याच्या तरतुदीला विरोध केला. त्यामुळं अडचणीत वाढ होण्याची शक्यताही मर्चट यांनी व्यक्त केली. तर या संयुक्त संसदीय समितीमध्ये राज्यसभेचे १० आणि लोकसभेचे २१ खासदार समाविष्ट असून या समितीची पहिली बैठक २२ ऑगस्टला होणार आहे.

# गौतमी पाटीलला अटी-शर्तीनुसार जामीन मंजूर



**अहमदनगर :** आपल्या हटके डान्समुळे लोकप्रिय असलेली डान्सर गौतमी पाटील आज वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आहे. यावेळी गौतमी पाटील कोणत्या कार्यक्रमात नाही तर चेहऱ्याला स्कार्फ आणि अतिशय साध्या ड्रेसमध्ये चक्क न्यायालयात दिसली. रंगीत साड्या घालून कार्यक्रम गाजवणारी गौतमी पाटील अहमदनगरच्या न्यायालयात दिसली. पण यामागचं नेमकं कारण काय?

गौतमीला भोवलेलं प्रकरण कोणतं?

अहमदनगरमध्ये २०२३ मध्ये गणपती विसर्जनाच्या दिवशी असाच एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रशासनाने या कार्यक्रमाला परवानगी नाकारली होती. पण तरीही कार्यक्रम पार पडला होता. हाच कार्यक्रम गौतमीला भारी पडला आणि तिच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी गौतमी पाटील न्यायालयाच्या आदेशानुसार कोर्टात हजर राहणे अनिवार्य होते. अन्यथा तिच्यासाठी वॉरंटदेखील निघू शकले असते. असे असताना आज शेवटी अहमदनगर जिल्हा न्यायालयात हजर राहावे लागलेच. न्यायमूर्तींनी तिची बाजू एकून घेत तिला अटी-शर्तीच्या आधारावर जामीन मंजूर केला.

गौतमीला ओळखणे झाले कठीण?

रंगीबेरंगी साड्या, लक्षवेधी हावभाव असा गौतमी पाटीलचा कार्यक्रमात लूक असतो. पण अहमदनगरच्या न्यायालयात हजर राहिलेल्या गौतमी पाटीलला ओळखणे मात्र कठीण झाले होते. कारण यावेळी गौतमी पाटील चेहऱ्याला स्कार्फ बांधून अतिशय साधा ड्रेस घालून न्यायालयात हजर झाली होती. अशा अवस्थेत गौतमी पाटीलला ओळखणे देखील कठीण झाले होते.

२०२३ चे प्रकरण?

गेल्या वर्षी गणपती विसर्जनाच्या दिवशी पाईपलाईन रोडवर गौतमीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आयोजकांनी विनापरवानगी कार्यक्रम घेत नियमांचे उल्लंघन केले होते. या संदर्भात पोलिसांच्या फिर्यादीवरून गौतमी पाटीलवर तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. न्यायालयाने अटी आणि शर्तीनुसार जामीन मंजूर केला आहे.

## रामदास कदमांचा पुन्हा चव्हाणांवर घणाघात

**मुंबई :** शिवसेना नेते रामदास कदम यांनी मंत्री रविंद्र चव्हाण यांच्यावर मुंबई-गोवा महामार्गावरुन मोठा वाद झाला आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या नाराजीनंतरही रामदास कदम त्यांच्या वक्तव्यावर ठाम आहेत. रामदास कदम यांनी पुन्हा एकदा रवींद्र चव्हाण यांच्यावर निशाणा साधला आहे.

'याला राजकारण म्हणता येणार नाही, याला १४ वर्षापासून मुंबई-गोवा महामार्गाचं काम चालू आहे. गेली १४ वर्ष कोकणवासीयांना वनवास बघावा लागतोय. प्रभू रामचंद्राचा वनवास संपला. तरी आजही आम्ही मुंबई-गोवा महामार्गावर प्रवास करू शकत नाही, अशी अवस्था आहे. मागच्या वर्षी रवींद्र चव्हाण यांनी आश्वासन दिलं होतं.

# कोल्हापुरातील महिला सन्मान सोहळा यशस्वी करा : पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या सूचना

**कोल्हापूर :** मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत कोल्हापूर जिल्ह्यात गुरुवारी तपोवन मैदानावर होणारा महिला सन्मान सोहळा यशस्वी करा, अशा सूचना पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी केल्या.

तपोवन मैदानावर गुरुवारी दि. २२ रोजी होणारा सन्मान सोहळा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे. या महिला सन्मान सोहळ्याची नियोजन बैठक पालकमंत्री श्री. मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील शाहूजी सभागृहात पार पडली. यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे, कोल्हापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. के. मंजूलक्ष्मी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस. कार्तिकेयन, जिल्हा पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित, अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी संजय तेली प्रमुख उपस्थित होते. यावेळी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले.

पालकमंत्री श्री. मुश्रीफ म्हणाले, लाभार्थी महिलांच्या सहभागातून होणारा हा कार्यक्रम सुरळीतपणे पार पाडण्यासाठी संबंधित सर्व अधिकाऱ्यांनी जबाबदाऱ्या चोख



पार पाडाव्यात. कार्यक्रमात सन्मानित करण्यात येणाऱ्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या महिला लाभार्थ्यांची तालुकानिहाय यादी तयार करा. कार्यक्रमात उपस्थित लाभार्थ्यांना फूड पॅकेट, नाश्ता, पिण्याचे पाणी, फिरत्या स्वच्छतागृहांची व्यवस्था, साफसफाई, पार्किंग, वाहतूक व्यवस्था यांचे योग्य नियोजन करा.

यावेळी मान्यवरांची बैठक व्यवस्था, पार्किंग, वैद्यकीय सुविधा, विद्युत पुरवठा, स्वच्छता, पोलीस बंदोबस्त यांचा आढावा त्यांनी घेतला.

यावेळी जिल्हाधिकारी यांनी कार्यक्रमस्थळी करण्यात आलेल्या तयारीची माहिती दिली.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# ऑलिंपिकवीर स्वप्नील कुसाळे यांच्या मिरवणुकीत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे: हसन मुश्रीफ

**कोल्हापूर :** पॅरिस येथील ऑलिंपिक स्पर्धेतील कांस्यपदक विजेते नेमबाज स्वप्नील कुसाळे यांची जिल्हा प्रशासनाच्या वतीने बुधवार २१ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता कावळा नाका येथील महाराणी ताराराणी यांच्या पुतळ्यापासून स्वागत मिरवणूक व त्यानंतर दसरा चौकात सत्कार समारंभ घेण्यात येणार आहे, या समारंभात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी केले आहे.





नेमबाज स्वप्नील कुसाळे यांच्या मिरवणूक व सत्कार समारंभाबाबत नियोजन बैठक पालकमंत्री श्री.मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील शाहूजी सभागृहात घेण्यात आली. यावेळी कोल्हापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. के. मंजूलक्ष्मी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस. कार्तिकेयन, पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित, अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी संजय तेली तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. तालुकास्तरीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले.

पॅरिस येथे झालेल्या ऑलिंपिकमध्ये ५० मीटर रायफल थ्री पोजीशनमध्ये कांस्य पदक प्राप्त झाल्यानंतर स्वप्नील कुसाळे पहिल्यांदाच आपल्या जिल्ह्यात येत आहे. कावळा नाका येथील महाराणी ताराराणी यांच्या पुतळ्यापासून ते दसरा चौकापर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून या मिरवणुकीनंतर दसरा चौकात सन्मानपत्र देऊन भव्य सत्कार गौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या मिरवणुकीदरम्यान स्वप्नीलवर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. तर ढोल ताशा, हलगी व झांज पथकाच्या गजरात मिरवणूक काढण्यात येणार आहे. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत होणाऱ्या कोल्हापूरच्या सुपुत्राच्या कौतुक सोहळ्यात जिल्ह्यातील नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

जिल्हा प्रशासनाच्या वतीने होणाऱ्या या भव्य मिरवणूक व सत्कार समारंभात नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केले आहे.

# दौंडमधील विकासासाठी सकारात्मक निर्णय घेणार : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** दौंड तालुक्यातील उजनी धरणाच्या बॅकवॉटर क्षेत्रात बुडीत बंधारे बांधण्यासाठी सुधारित धोरण ठरविण्याबाबत समिती स्थापन करण्यात येणार आहे. समितीच्या अहवालानंतर धोरण निश्चित करण्यात येणार आहे.

दौंड येथील विविध विकासात्मक कामासंदर्भात आमदार राहुल कुल यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने सकारात्मक निर्णय घेण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. यासंदर्भात आज सह्याद्री अतिथीगृह येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी आमदार श्री. कुल, आमदार जयकुमार गोरे, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव असिमकुमार गुप्ता यांच्यासह दौंड तालुक्यातील विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

खडकवासला धरण ते फुरसुंगी-लोणी काळभोरपर्यत भूमिगत कालवा करण्याच्या प्रकल्पास मंजुरी देणे.जलविद्युत निर्मितीसाठी मुळशी व कोयना




प्रकल्पाद्वारे कृष्णा खोऱ्यातील नैसर्गिकरित्या पूर्वमुखी नद्यांचे कृत्रिमपणे पश्चिमेकडील विपुलतेच्या खोऱ्यात वळविलेले पाणी पूर्वेकडे तुटीच्या खोऱ्यात वळविण्याबाबत स्थापन केलेल्या सुर्वे समितीचा अहवाल स्वीकारून, धोरण निश्चित करणे याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. हे विषय मार्गी लावण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रुपांतरण करणे व अस्तरीकरण करण्याच्या कामासाठी प्रशासकीय मान्यता व मंत्रिमंडळ मान्यता मिळणे तसेच राज्यातील चिबड, खारवट व पाणथळ शेतजमिनी निर्मूलनासाठी सुधारित धोरण निश्चित करून दौंड तालुक्यातील कामांना मान्यता देणेबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल.यवत येथील सिटी सर्व्हे ५५० व ५७४ मधील जलसंपदा विभागाच्या नावे असलेल्या १ हे. ३० आर क्षेत्रापैकी १ हे. क्षेत्र यवत पोलीस स्टेशन इमारत व पोलीस वसाहत बांधकामाकरिता पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या नावे हस्तांतरीत करण्यासाठी सकारात्मक विचार करण्यात येणार असल्याचे सांगून दौंड तालुक्यातील एमएसईडीसीएल च्या विविध समस्या आणि मागण्यांकरिता ऊर्जा सचिवाना सूचना देण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवटीच्या हालचाली

मुंबई : गेल्या आठवड्यात निवडणूक आयोगानं जम्मू काश्मीर आणि हरियाणा विधानसभा निवडणुकांची घोषणा केली, मात्र त्यावेळी महाराष्ट्र विधानसभेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला नाही, त्यामुळे विधानसभा निवडणुका दिवाळीनंतर म्हणजेच नोव्हेंबरमध्ये होतील, असं बोललं जात होतं. मात्र आता राज्यात गुलाबी थंडीत राजकारणाचा पारा चढण्याची शक्यता आहे. कारण राज्यात विधानसभा निवडणूक लांबणीवर पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विधानसभा निवडणुका डिसेंबरमध्ये होण्याची शक्यता आहे. खरं तर महाराष्ट्र विधानसभा निवडणुका २६ नोव्हेंबर २०२४ पूर्वी पार पडणे अपेक्षित आहे. मात्र यंदा मुदत संपल्यानंतर निवडणुका होण्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे. याला 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना कारणीभूत असल्याचीही चर्चा आहे.

महाविकासआघाडीच्या नेत्यांनी यावरुन पंतप्रधान मोदींसह राज्यातील सत्ताधारी महायुतीवर निशाणा साधलाय. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी थेट पंतप्रधान मोदींना लक्ष्य केलंय. तर सत्ताधाऱ्यांना पराभवाची भीती असल्यानं निवडणुका लांबणीवर टाकण्याचा घाट असल्याचा आरोप महाविकासआघाडीच्या नेत्यांनी केला आहे.

नुकताच रक्षाबंधनाच्या मुहूर्तावर लाडकी बहीण योजनेचा पहिला-दुसरा हफ्ता बहिणींना मिळाला. मात्र आणखी किमान दोन हफ्ते द्यावेत, अशी सरकारची भावना आहे. म्हणजेच सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्याचे आणखी सहा हजार कुठल्याही आचारसंहितेत न अडकता लाडक्या बहिणींपर्यत पोहोचावेत आणि अधिकाधिक महिला मतदार आकर्षित व्हाव्यात, असा सरकारचा प्लॅन असल्याचे बोललं जातंय. त्यामुळे डिसेंबरच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात विधानसभा निवडणुकांचे मतदान होऊन निकाल लागण्याचा अंदाज वर्तवला जातोय. त्यामुळे ऑक्टोबर महिन्याच्या अखेरच्या टप्प्यात विधानसभेचे बिगुल वाजण्याचे संकेत मिळत आहेत.

पाच वर्षापूर्वी हरियाणा आणि महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका सोबत झाल्या होत्या. मात्र यंदा राज्यात विधानसभा निवडणुका डिसेंबरमध्ये होतील अशी चर्चा सुरु आहे. राज्यात राष्ट्रपती राजवट लावून डिसेंबरमध्ये निवडणुका होणार असल्याची चर्चा रंगली आहे. लाडकी बहीण योजनेमुळे निवडणुका लांबणीवर जातील अशी कुजबूज सुरु आहे. हरियाणा आणि जम्मू-काश्मीरमधील विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला होता. तेव्हाच महाराष्ट्रातील निवडणूक लांबणीवर पडेल, असे संकेत मिळाले होते.

# रोहीतदादा कल्चरल ग्रुपकडून ४० मुलांना दिले ८० ड्रेस, रवी पाटील यांचे दातृत्व

**तासगाव :** सध्या मराठी शाळांचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत चाललाय. मराठीची गळती पहिल्यांदा शहरातून सुरू झाली. आता ती खेड्यापाड्यात पोहोचली. मात्र १५ ऑगस्टला घालायला ४० पोरांना ड्रेस न्हवते. ही बातमी समजताच रोहितदादा कल्चरल ग्रुपच्या वतीने बाजार समितीचे संचालक रवींद्र पाटील यांनी त्या मुलांना प्रत्येकी दोन ड्रेस असे ८० ड्रेस देऊन पोरांच्या चेहऱ्यावर हासू आणलं. त्यांच्या दातृत्वाचे तालुक्यात कौतुक होत आहे.

समाजात मंदिरांना देणग्या देताना लोकांची चडाओढ लागते. कोण जास्त देणगी देणार. मात्र हाच विषय शाळेच्या बाबतीत आला की लोकांचा हात आखडला जातो. सरकारी शाळा बंद पाडून



खाजगी शाळा सुरू राहिल्या पाहिजेत हा डाव राज्यभरात सुरू आहे. तासगाव शहरातील संस्कार भारती विद्यामंदिर ही विना अनुदानित शाळा. ४० विद्यार्थी संख्या.

शहरातील गोरगरिबांची पोरं या शाळेत शिकायला. १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन देशाच्या स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमाला पोरांना अंगावर घालायला शाळेचे ड्रेस नव्हते. ही बातमी मिलिंद पोळ यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून देत मदतीचे आवाहन केले. यानंतर रोहित दादा कल्चरल ग्रुपचे रवींद्र पाटील यांनी तात्काळ या प्रकरणाची दखल घेत माहिती घेतली. यावेळी या शाळेत ४० मुले असून त्या मुलांना रोज घालण्यासाठी ड्रेस नसल्याचे लक्षात आले.

यानंतर रवींद्र पाटील यांनी ड्रेसची खरेदी करा बिल मी देतो असे सांगितले. शाळेच्या शिक्षकांनी तासगाव येथे ४० विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन प्रमाणे ८० ड्रेस खरेदी केले. त्याचे २३ हजार ५०० इतके बिल झाले. यानंतर १५ ऑगस्ट रोजी नवे कपडे घालून झेंडावंदन करायला आलेल्या पोरांच्य चेहऱ्यावरचा आनंद बघण्यासारखा होता.

मात्र ही मदत करताना ती मदत कोणाला कळू नये याची काळजी त्यांनी घेतली. मात्र अलीकडे दातृत्व असणाऱ्या लोकांची संख्या कमी झाली असून शिक्षणासाठी व शाळांसाठी मदत करणाऱ्यांची संख्या तर पार रोडावली आहे. त्यामुळे रोहित दादा कल्चरल ग्रुप वर रवींद्र पाटील त्यांच्या या मदतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# प्रकाश आंबेडकर बदलापूर प्रकरणावरुन पोलिसांवर संतापले

**मुंबई :** "कुठल्या विषयावर लाथीचार्ज करावा आणि कुठे करू नये यावर शासनाने नियम केला पाहिजे. लोक अत्याचाराविरोधात आंदोलन करत होते, रेल्वे बंद झाल्यामुळे लोकांना त्रास झाला, पण अशा संवेदनशील विषयावर पोलिसांनी लाठीचार्ज आणि शासनाने लाठीचार्ज करायला सांगणे या दोन्ही गोष्टी चुकीच्या आहे. शासन आणि पोलीसांचा निषेध करतो", असे वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर म्हणाले. बदलापूर येथील आंदोलकांवर लाठीचार्ज केल्याप्रकरणी त्यांनी नाराजी व्यक्त केली.

लोकांसोबत व्यवस्थित डायलॉग झाला असता तर हे शांतता राहिली असती

प्रकाश आंबेडकर म्हणाले, देशात हेटरेटमुळे समाज गुन्हेगारी करायला लागला आहे. त्याचेच हे परिणाम आहे, संस्था स्वत: देश आणि पॉलिटिकल पार्टी यांनी संयम आणि शांतता करायला पाहिजे. दुर्दैवाने आरएसएस बजरंग दल आणि भाजप तिन्ही पक्ष वायलंसचा प्रसार करत आहे. आरोपी पोलिसांच्या ताब्यात असल्यावर सुरक्षा करणे हे पोलिसांचा काम आहे. पण आंदोलकांना शांत कस करायच हे ही पोलीसांच काम आहे. लोकांसोबत व्यवस्थित डायलॉग झाला असता तर हे शांतता राहिली असती. या सगळ्याचा अभाव या ठिकाणी दिसून आला. म्हणून लाठीचार्ज झाला, असंही प्रकाश आंबेडकर यांनी सांगितलं.


# डोंगरसोनीतील त्या अंगणवाडीचे बांधकाम निकृष्ट

तासगाव; तासगाव तालुक्यातील डोंगरसोनी येथील अंगणवाडी क्र. १८७ चे बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाल्याचे अखेर बांधकाम विभागाने आपल्या अहवालात मान्य केले असून या अंगणवाडीची वेळेत दुरुस्ती न केल्यास संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याचा इशाराच बांधकाम विभागाने दिला आहे.

डोंगरसोनी येथील अंगणवाडी क्र. १८७ चे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असून ही इमारत ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्यागोदरच त्याला भेगा पडल्या आहेत. त्यामुळे या बांधकामाची चौकशी व्हावी, अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य अमित झांबरे यांनी केली होती. याबाबतचे निवेदन त्यांनी गटविकास अधिकारी डॉ. संताजी पाटील यांना दिले होते. यावर दि.९ ऑगस्ट रोजी बांधकाम विभागाचे शाखा अभियंता यांनी सदर अंगणवाडीच्या बांधकामाची पाहणी करून आपला चौकशी अहवाल सोमवार दि.२० ऑगस्ट रोजी गटविकास अधिकाऱ्यांकडे सादर केला. त्यानुसार सदर अंगणवाडीचे बांधकाम अतिशय निकृष्ट झाल्याचे बांधकाम विभागाकडून मान्य करण्यात आले असून सदर अंगणवाडीची दुरुस्ती करण्याचे आदेश संबंधित कंत्राटदाराला देण्यात आले आहेत. तसेच या सदर अंगणवाडीची वेळेत दुरुस्ती न केल्यास सदर कंत्राटदाराला शासनाच्या काळ्या यादीत टाकण्याचा इशाराच सार्वजनिक बांधकाम विभागाने दिला आहे.


डोंगरसोनीतील सर्वच निकृष्ट दर्जाच्या कामांची चौकशी करा - अमित झांबरे

शासनाकडून जनतेच्या विकास कामांसाठी पैसा दिला जातो मात्र कंत्राटदाराकडून ही कामे चांगल्या दर्जाची होत नाहीत. डोंगरसोनी गावात शासनाकडून करण्यात आलेली अनेक कामे निकृष्ट दर्जाची झाली असून याबाबत नागरिकांमधून मोठ्या प्रमाणात तक्रारी येत आहेत. या कामांमध्ये मोठा भ्रष्टाचार झाला असण्याची शक्यता असून या सर्व कामांची देखील चौकशी करण्यात यावी अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य अमित झांबरे यांनी केली आहे.



# नमो शेतकरी महासन्मानसाठी २ हजार कोटी मंजूर
# चौथा हप्ता लवकरच मिळणार

**मुंबई :** महाराष्ट्र सरकारनं पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेच्या पार्श्वभूमीवर राज्यातील शेतकऱ्यांसाठी दरवर्षी सहा हजार रुपये देण्याचा निर्णय घेतला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१९ मध्ये देशातील शेतकऱ्यांसाठी पीएम शेतकरी सन्मान योजना सुरु केली होती. या योजनेनुसार शेतकऱ्यांच्या खात्यात दरवर्षी तीन हप्त्यांमध्ये सहा हजार रुपये जमा केले जातात. राज्य सरकारनं २०२३-२४ मध्ये राज्यातील शेतकऱ्यांसाठी नमो शेतकरी महासन्मान योजना जाहीर केली होती. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांच्या खात्यात आतापर्यंत तीन हप्त्यांचे सहा हजार रुपये जमा करण्यात आले आहेत. आता नमो शेतकरी महासन्मान योजनेचा चौथा हप्ता लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केला जाणार आहे. राज्य सरकारनं



चौथ्या हप्त्यासाठी २०४१ कोटी रुपये मंजूर केले आहेत.

राज्य सरकारकडून खर्चाला मान्यता

राज्य सरकारनं नमो शेतकरी महासन्मान योजनेसाठी आतापर्यंत ५५१२ कोटी रुपयांचा निधी वितरित केला आहे. गेल्या वर्षी एप्रिल ते जुलै या ती महिन्यांच्या कालावधीसाठी १७२० कोटी रुपये खर्च केले होते. त्यानंतर ऑगस्ट ते नोव्हेंबर या कालावधीसाठी १७९२ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला होता. डिसेंबर ते मार्च या कालावधीसाठी २ हजार कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला होता. आता या योजनेचा चौथा हप्ता शेतकऱ्यांना देण्यासाठी २०४१ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून प्रशासकीय खर्चासाठी २० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

नमो शेतकरी महासन्मान योजनेचा चौथा हप्ता लवकरच

राज्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात या योजनेच्या तीन हप्त्यांची रक्कम जमा झालेली आहे. आता राज्य सरकारनं या योजनेच्या चौथ्या हप्त्यासाठी खर्चाला मान्यता दिली आहे. यासंदर्भातील शासन निर्णय जाहीर करण्यात आला आहे. यामुळं राज्यातील शेतकऱ्यांना आगामी काळात चौथ्या हप्त्याचे दोन हजार रुपये मिळणार आहेत.

पीएम किसान योजनेच्या धर्तीवर राज्यात एकनाथ शिंदे यांच्या सरकारनं शेतकऱ्यांसाठी नमो शेतकरी महासन्मान योजना सुरु केली होती. या योजनेतून शेतकऱ्यांना प्रत्येकी हप्त्यामध्ये दोन हजार रुपये मिळाल आहेत. पीएम किसान योजनेद्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात १७ हप्त्यांमध्ये एकूण ३४ हजार रुपयांची रक्कम पाठवण्यात आलेली आहे.

दरम्यान, राज्य सरकारनं नुकतीच राज्यातील पात्र महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली असून त्याद्वारे महिलांच्या खात्यामध्ये दरमहा १५०० रुपये पाठवण्यात येणार आहेत. आतापर्यंत दोन महिन्यांची रक्कम जमा करण्यात आलेली आहे.

## राखी पौर्णिमेच्या मुहूर्तावर अवघा महाराष्ट्र लाडकी बहिणमय !

**मुंबई :** महायुती सरकारने आणलेल्या लाडकी बहिण योजनेने आघाडी पक्षांना सळो की पळो करून सोडले आहे. एका बाजूला या योजनेचा लाभ आपल्याला मतदान करणाऱ्या महिलांना मिळवून देण्यासाठी त्यांच्यात झुंबड उडाली आहे; तर दुसऱ्या बाजूला ही योजना कशी चुकीची, वाईट, तद्दन आहे असे दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे.

पण ज्या महिला लाभार्थी आहेत, त्यांच्या बँकेत पैसे जमा झाल्यामुळे त्यामागचे ीश्रळव लेर्पीीळलींळेप आणि सरकारची मेहनत याचा खूपच चांगला परिणाम या कष्टकरी महिलांच्या आयुष्यावर होताना दिसू लागला आहे. १७ तारखेला दोन महिन्यांचे मिळून ३००० रुपये ऐशी लाख महिलांच्या खात्यात जमा झालेले आहेत.

# रामदास कदमांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे मारो आंदोलन

**रायगड :** कोकणात भाजप नेते रवींद्र चव्हाण आणि शिवसेना नेते रामदास कदम यांच्यातील वाद आता विकोपाला गेल्याचं दिसून येतंय. रवींद्र चव्हाण यांच्यावर केलेल्या टीकेनंतर भाजप कार्यकर्ते आक्रमक झाले असून कर्जतमध्ये रामदास कदमांच्या पुतळ्याला जोडे मारो आंदोलन करण्यात आलं. रामदास कदम यांनी बेताल वक्तव्य बंद करावं नाहीतर त्यांना परिणाम भोगावा लागेल असा इशाराही भाजपच्या कार्यकर्त्यांनी दिला.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरून महायुतीमध्ये तणाव निर्माण झाल्याचे चित्र आहे. शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि भाजप नेते रवींद्र चव्हाण यांच्यावर टीका करत राजीनाम्याची मागणी केली होती. त्यावर आता भाजप कार्यकर्ते आक्रमक झाल्याचे दिसत आहे. कर्जतमध्ये भाजपच्या कार्यकर्त्यांनी रामदास कदम यांचा निषेध करत जोडे मारो आंदोलन केले आहे.

भाजपने लोकसभेत प्रामाणिकपणे महायुतीचा धर्म पाळत काम केले. मात्र अशा प्रकारे आमच्या नेत्यांवर बेताल वक्तव्य कराल तर रायगडमधील शिंदे गटाच्या तीनही जागांवर भाजपचा उमेदवार उभा करू असा इशारा देत भाजपने दंड थोपटले आहे.

दरम्यान, रामदास कदम आणि रवींद्र चव्हाण यांच्यातील भांडणामुळे महायुतीमधील वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असून युतीत मिठाचा खडा पडल्याचं चित्र आहे. मुंबई गोवा महामार्गाचं काम गेले अनेक वर्षे सुरूच आहे. आजवर हे काम पूर्ण होऊ शकलेलं नाही. अशात खुद्द केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी देखील या महामार्गाची पाहणी करून रस्ता लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले होते. मात्र तरीही त्यांनी देखील संसदेत या रस्त्यावरून हात जोडले.

दुसरीकडे, राज्याच्या विधानसभेत या महामार्गावरून चेष्टा करण्यात आल्याची बाब घडली होती. आता सागरी मार्गाचा आग्रह धरत मुंबई गोवा महामार्ग केला जात आहे. असे असले तरी या नव्या रस्त्याचा कोकणी माणसाला फायदा नाही. तर कोकणच्या विकासाची लाइफलाईन असलेला मुंबई गोवा महामार्ग हा दुर्लक्षित राहिला असल्याचं एकंदर चित्र आहे.

# खिद्रापूर मंदिराच्या संवर्धनासाठी २१ कोटींचा निधी मंजूर : आ. डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर



**जयसिंगपूर :** १२ व्या शतकातील शिल्पकलेचा अदभूत नमुना असलेल्या हेमाडपंथी श्री कोपेश्वर मंदिर जतन, संवर्धन व परिसराच्या विकास करण्याअंतर्गत महाराष्ट्र राज्य सरकारच्या माध्यमातून २१ कोटी रुपयांचा भरघोस निधी प्राप्त झाल्याने श्रीक्षेत्र कोपेश्वर मंदिर परिसराचा विकास होणार आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या बजेटमध्ये या कामाचा समावेश केला होता. या कामाची निविदा प्रक्रिया प्रसिद्ध झाली असून प्रत्यक्षात या कामाला सुरुवात होणार असल्याची माहिती शिरोळ तालुक्याचे लोकप्रिय आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने खिद्रापूर येथील कोपेश्वर मंदिर दुरुस्ती व सुशोभीकरण करण्यासंदर्भात किमया कॉन्सर्वेशन व आर्किटेक या फर्मची नेमणूक केली होती. त्या अनुषंगाने त्यांनी मंदिराचा अहवाल सादर केला. अतिवृष्टी व सातत्याने आलेला महापूर या नैसर्गिक आपत्तीमुळे या मंदिराला तडे गेले होते व झीज झाली होती, त्या ठिकाणी रासायनिक संवर्धन प्रक्रिया केली जाणार आहे. याशिवाय मंदिर परिसराचे सुशोभीकरण या निधीच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

हे मंदिर पुरातत्व खात्याच्या अधिन असल्याने या मंदिरच्या जतन व संवर्धनाच्या प्रस्तावाला केंद्रीय पुरातत्व विभागाने मान्यता दिली. त्यानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने खिद्रापूर कोपेश्वर मंदिराचे जतन, संवर्धन, दगडी फरस बंदी तसेच परिसराचा विकास करण्यासाठी २१ कोटींच्या कामाची निविदा प्रसिद्ध केली असून प्रत्यक्षात लवकरच या कामाला सुरुवात होणार आहे. याकामी राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजितदादा पवार यांचे सहकार्य लाभले.

# डॉल्बी चालक-मालकांनी नियमांचे पालन करून गणेशोत्सव साजरा करावा : स.पो.नी फडणीस

**.कुरुंदवाड :** गणेशोत्सवाच्या काळात ध्वनी प्रदूषण होऊ नये वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये नागरिकांच्या डोळ्याला त्रास होईल असे लाइटिंग उपकरणे वापरात येऊ नये त्याचबरोबर शासनाने घालून दिलेल्या नियम अटी बरोबरच वेळेचे बंधन राखून मिरवणुका पाडाव्यात अशा सूचना सपोनि रविराज फडणीस यांनी दिल्या.

गणेशोत्सवाच्या काळात डॉल्बी वरून शांतता भंग झाल्यास डॉल्बी चालकावर गुन्हे दाखल करणार असल्याचा इशाराही सपोनि फडणीस यांनी दिला आहे.

येथील पोलीस ठाण्यात बुधवारी सकाळी११ वाजता पोलीस ठाण्याच्या सभागृहात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर डॉल्बी चालक-मालक आणि पोलीस पाटील यांच्या बोलविण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते.उपनिरीक्षक



**कुरुंदवाड पोलीस ठाण्यात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेली पोलीस पाटील डॉल्बी चालक-मालकांची बैठक**

सागर पवार,गोपनीय शाखेचे फारूक जमादार,कार्यक्षेत्रातील सर्व गावातील पोलीस पाटील,

तंटामुक्त अध्यक्ष, विविध मंडळाचे पदाधिकारी व साऊंड सिस्टमचे मालक आदी प्रमुख उपस्थित होते.

यावेळी बोलताना सपोनि फडणीस म्हणाले की कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याचे आवाहन माझ्यापुढे आहे. यासाठी आपल्या सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा आहे. गणेशोत्सव भक्तिमय वातावरणात साजरा करावा डॉल्बी चालकांनी गणेशोत्सव काळात शासनाने ठरवून दिलेल्या वेळेच्या मर्यादेचे पालन करावे, आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घ्यावी तसे न झाल्यास त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल,लाईट करता व साऊंड सिस्टिम करता जोडण्यात येणारे स्ट्रक्चर हे नियमात असावे त्यामुळे कुठेही सार्वजनिक वाहतुकीस अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी,कोणत्याही पंत, जाती, धर्म , गटाचा अथवा समाजाच्या भावना दुखावणारे मजकूर असलेले गाणी लावू नयेत. यावर पोलीस प्रशासनाची करडी नजर असल्याचे सांगितले.

यावेळी पोलीस पाटील मानसिंग भोसले,दिपाली पाटील, गिरीश पाटील, रावसाहेब पाटील, रवी कांबळे, अमीर पठाण,युसूफ नदाफ,अनिल चव्हाण,ज्ञानदेव सानप आदी उपस्थित होते.

# विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांचा सरकारला घरचा आहेर

**कोल्हापूर :** बदलापूर येथे चिमुरड्या मुलीच्यावर झालेल्या अत्याचारा बद्दल बोलताना, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी, या घटनेबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत पोलिसांचा वचक राहिला नसल्याचं सांगत सरकारला घरचा आहेर दिलाय. कोल्हापूर दौऱ्यावर आज नीलम गोऱ्हे आल्या होत्या . त्यांवेळी त्यानी पत्रकारांशी संवाद साधला. मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या फोन नंतर त्यांनी कोल्हापुरातील सर्व कार्यक्रम रद्द करून विशेष विमानाने त्या बदलापूरकडे रवाना झाल्या.

बदलापूरच्या घटनेवरून विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी पोलिसांच्या कार्यपध्दतीवर तीव्र संताप व्यक्त करत, सरकारला घरचा आहेर दिला आहे. त्या आज कोल्हापुर, दौऱ्यावर आल्या होत्या. त्यावेळी त्यानी शासकीय विश्रामगृह येथे पत्रकारांशी संवाद साधला. दरम्यान बदलापूरच्या घटनेवरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, गोऱ्हे यांना तातडीने बदलापूरला पोहचायला सांगितल्याने, त्या खास विमानाने कोल्हापुरातील सर्व कार्यक्रम रद्द करून रवाना झाल्या. बदलापूर घटनेवर बोलताना त्यांनी, पालकांनी आणि नागरिकांनी कायदा हातात घेऊ नये. कायद्याच्या चौकटीत राहूनच लवकरात लवकर गुन्हेगारांना कशी शिक्षा देता येईल हे पाहणे महत्त्वाचे असल्याच त्यांनी सांगितलं. संबंधित खटला जलद गतीने फास्ट कोर्टात चालवण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील राहील. संबंधित संशयित गुन्हेगारांना फाशी लवकरात लवकर कशी देता येईल यासाठी प्रयत्न केला जाईल. बदलापूर येथे पोहचून संपूर्ण परिस्थितीचा आढावा घेणार असून त्याचा अहवाल राज्य सरकारला सुपूर्द करणार असल्याच त्यांनी सांगितल.

ज्या तरतुदी होत्या त्याचा केंद्र सरकारने, नवीन दंड संहितेत समावेश केल्याचं त्यांनी सांगितलं. सामाजिक सलोखा राखणे ही सर्वांची जबाबदारी आहे.. आपण राज्यघटना मानणारे असलो तर दुसऱ्या धर्माच्या माता-भगिनीवर अन्याय होता कामा नये. असंही त्यांनी सांगितलं. लव्ह जिहाद कायद्याबाबत बोलताना त्यांनी, ज्या ठिकाणी आंतरजातीय विवाह केले जातात.. आणि अशावेळी लग्न करणारे सज्ञान असतील तर अशा बाबतीत कायदा करणे अडचणीचे ठरू शकते.. असही त्यांनी सांगितले

# राज्य सरकार ॲक्शन मोडवर, बदलापूर प्रकरणात SIT स्थापन

**मुंबई :** बदलापूरच्या एका नामांकित शाळेत दोन चिमुकल्या मुलींवर लैंगिक अत्याचार प्रकरणाचा पुढील तपास करण्यासाठी राज्य सरकारकडून एसआयटीची स्थापना करण्यात आली आहे. आरती सिंह ,विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक गठीत करण्यात येत असल्याची माहिती छेरिंग दोरजे विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) यांनी दिली आहे.

या प्रकरणात बदलापुर पुर्व पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम ६५(२),७४,७५,७६ सह पोक्सो कायदा कलम ४ (२),८, १० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास करण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरती सिंह,विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक गठीत करण्यात येणार असल्याची माहिती दिली होती. राज्य सरकारने या प्रकरणात कारवाई करत गुन्हा दाखल करण्यास दिरंगाई करणाऱ्या तीन पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे.

# पाटण येथे रानभाजी महोत्सवाचे आयोजन

**पाटण :** महाराष्ट्र शासन कृषी विभाग कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा सातारा तालुका कृषी अधिकारी कार्यालय पाटण यांचे संयुक्त विद्यमाने दि.१४/०८/२०२४ रोजी पंचायत समिती पाटण येथे रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सदर महोत्सवात कृषी विज्ञान केंद्र, कालवडे च्या विषय विशेषज्ञ सौ. प्रियदर्शनी देशमुख यांनी रानभाज्यांचे गुणधर्म व मानवी आहारातील महत्त्व या बाबत मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक पाटण तालूका कृषी अधिकारी कुंडलिक माळवे यांनी केले.

कार्यक्रमास सहाय्यक गट विकास अधिकारी राजाराम लोखंडे , पंचायत समितीचे कृषी अधिकारी निरजकुमार बोडके, श्री.शामराव पवार उपसपंच कोकिसरे यांच्या सह सर्व कृषी पर्यवेक्षक, कृषी सहाय्यक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक अजीत गायकवाड यांनी केले , तर सहाय्यक गट विकास अधिकारी लोखंडे यांनी आभार प्रदर्शन केले.या महोत्सवाचे उद्घाटन सहा. गटविकास अधिकारी राजाराम लोखंडे, कृषी अधिकारी कुंडलिक माळवे यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. दरम्यान या रानभाजी महोत्सवात स्टॉलवर विविध प्रकारच्या रानटी रानभाज्या ठेवण्यात आल्या होत्या. या महोत्सवास चांगला प्रतिसाद मिळाला, यावेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थिती होते.